# मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर गंगाखेड, यांच्या न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र. ३१८/२०२५

Exh - 49

वादी : अंगद

विरुद्ध

प्रतिवादी : तहसीलदार व इतर

ORDER
Read & recorded.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.07 16:50:57 +0530
CJSD, Gangakhed.

महोदय,

वरील प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ आपला लेखी जबाब दाखल करीत आहेत. तोच निशाणी क्र. ५ साठी गृहीत धरुन वाचण्यात यावा.

१) हे की, सदर प्रकरण हे यापुर्वी प्रतिवादी क्रं. १ यांच्या कार्यालयात सुनावणी करण्यात आलेले आहे. त्या प्रकरणात प्रतिवादी क्रं. १ यांनी सुनावणी दरम्यान आदेशीत केल्यानुसार प्रतिवादी क्रं. २ व ३ हे दिनांक २७.०१.२०२५ रोजी विवादीत जमीनीची जायमोक्क्यावर जाउन सळिपाहणी व पंचानामा केला तत्पुर्वी अर्जदार व गैरअर्जदार व संबधीतांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या.

२) हे की, सदर पंचनाम्यामध्ये सदर वादातील १ आर जागा ही जोशी व वल्हार समाजाच्या स्मशानभुमीसाठी मयत नामदेव गणपत दणदणे यांनी १००/— रुपयांच्या बॉण्डवर ४०,०००/— रुपये घेउन दानपत्र करुन दिल्याचे पंचानी आमच्या समक्ष सांगितलेले आहे. त्यानुसार त्या जायमोक्क्यावर पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे.

३) हे की, सदर पंचनामा व स्थळ पाहणी अहवाल प्रतिवादी क्रं. १

Recd copy
[signature]
Dt:-07/10/25

यांच्याकडे दाखल करण्यात आला व त्यानंतर प्रतिवादी कं. १ यांनी सदर सुनावणीमध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे तसेच सदर ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी व पोलिस पाटील यांचे म्हणणे देखील ऐकुण घेतले व त्यानुसार ०२.०६.२०२५ रोजी आदेश दिला. त्या आदेशानुसार मौ. आनंदवाडी येथील गट कं. २५५/१ मधील १ आर जमीनीची नोंद इतर अधिकारामध्ये सातबारावर घेण्यात आली.

४) हे की, सदर वादातील प्रतिवादी कं. १ यांच्याकडे झालेल्या सुनावणीनुसार जी कार्यवाही करण्यात आलेली आहे ती योग्य व कायदेशीर रितीने करण्यात आलेली आहे.

प्रतिवादी कं. १ ते ३ तर्फे

राम पि. बबन उधार
प्रतिवादी कं. ३

**प्रार्थना**

वादीने दिलेला दावा व निशाणी क्र. ५ चा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

दि. ०१/१०/२०२५

प्रतिवादी कं. १ ते ३ तर्फे

मार्फत

(ॲड.एस.बी.पौळ)
सहाय्यक सरकारी अभियोक्ता,
गंगाखेड

राम पि. बबन उधार
प्रतिवादी कं. ३

<u>मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर गंगाखेड, यांच्या न्यायालयात</u>

**नियमित दिवाणी दावा क्र. ३१८/२०२५**

**वादी : अंगद**

**विरुद्ध**

**प्रतिवादी : तहसीलदार व इतर**

**शपथपत्र**

मी राम पि. बबन उधार वय २६ वर्षे व्यवसाय– तलाठी सज्जा महातपुरी रा. गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी शपथेवर निवेदन करतो की,

१. सदर प्रकरणात दाखल केलेल्या जबाबातील परिच्छेद क्रं. १ ते ४ मधील मजकुर खरा व बरोबर असुन तो माझ्या माहिती व सांगितल्याप्रमाणे लिहीलेला आहे.

करीता हे शपथपत्र देत आहे.

निवेदक

रा.ब.उधार

राम पि.बबन उधार

**सत्यापन**

वरील मजकुर मी वाचला असुन तो माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार खरा व बरोबर आहे, खोटा नांही.

स्थळ :– गंगाखेड
दिनांक:– ०१.१०.२०२५

निवेदक

रा.ब.उधार

**राम पि.बबन उधार**

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me

by Ram Baban Udhar, Age-26 yrs

occu- Service, R/o. Gangakhed

Who is identified before me

by Shri. S. B. Paul, A.G.P.

to whom I Know Personally

Supdt.

CJSD Court, Gangakhed